सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
14 Sep 2024 - Page 13

## संक्षिप्त वृत्त...



# लोकमान्य टिळक महाविद्यालयात सायबर सुरक्षा विषयी जनजागृती

**कदेर, दि.१३ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावातील लोकमान्य टिळक महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला. राजश्री शाहू कॉलेज येथे शिकणारी कॉम्पुटर इंजिनिअरिंग शिकणारी कोरेगाव येथील रहिवाशी प्रतीक्षा पांगे हिने सायबर सुरक्षा विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समाज माध्यमांचा वापर करताना कोणकोणती काळजी घ्यावी याचे सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. औरादे यांनी केले. विद्यालयाचा वतीने प्रथमतः तिचे संस्थेचे अध्यक्ष एम.एस. जाधव यांचा हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव धनराज जाधव, रमेश पांगे, मुख्याध्यापक बी.ए. गायकवाड, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.